**<u>दिनांक 17-07-2009 रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र व समन्वय समितीच्या सभेचे कार्यवृत</u>**

आज दि. 17-07-2009 रोजी मा.निवासी उपजिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग केन्द्र, गडचिरोली तर्फे जिल्हा उद्योग मित्र व जिल्हा सल्लागार समितीच्या सभेचे आयोजन सकाळी 11.30 वाजता करण्यात आले.

सदर सभेस खालील सदस्य/अधिकारी उपस्थित होते.

1 मा. जिल्हाधिकारी साहेब, गडचिरोली
2 श्री. ओ.एच. अग्रवाल ,सचिव,जिल्हा उघू उद्योग संघटना वडसा
3 श्री. पी.सी. शेळके, क्षेत्रव्यवस्थापक, एमआयडीसी, चंद्रपूर.
4 श्री. एम.के. पेशट्टीवार, जिल्हा ग्रामोद्योग्र अधिकारी, गडचिरोली
5 श्री. एस.झेड. नारनवरे, शाख व्यवस्थापक, एमएसएसआयडीसी, गडचिरोली
6 श्री. एन.एम. निलमकर, उपप्रबंधक, बँक ऑफ महाराष्ट्र, गडचिरोली
7 श्री. अतुल रा. आदे, सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी
8 श्री.विवेक तोंडरे, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केन्द्र, गडचिरोली
9 श्री.प्रशांत जू. वैद्य, मत्स्य विकास अधिकारी, गडचिरोली
10 श्री.एन.डी. शर्मा स.न.र., नगररख्ना कार्यालय, गडचिरोली
11 श्री. के.झेड. भूरे, क.रो.स्व.रो.माअ. जि.रो.स्व.रो.मा.के. गडचिरोली
12 श्री. के.पी. बन्ते, प्रतिनिधी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, गडचिरोली
13 श्री. ए.एम. कोमलकर, उपअभियंता, म.औ.वि.म. चंद्रपूर
14 श्री. मनोज कुबडे, मिटकॉन, गडचिरोली
15 श्री.आफताब खान, प्रोजेक्ट मॅनेजर , ए.ए. एनर्जी मर्या.
16 श्री. वाय. पी. कांबळे, सहा. अभियंता म.रा.वि.वि.क.म. उपविभाग, गडचिरोली
17 श्री. एस.एस.बागडे, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र, गडचिरोली.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केन्द्र, गडचिरोली यांनी सभेस उपस्थित अधिका-यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्या परवानगीने सभेस सुरवात केली. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली.

**<u>अ) जिल्हा उद्योग मित्र समिती शी संबंधित मुद्दे :-</u>**

**<u>1 मागिल सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे :-</u>**

दिनांक 26-12-2008 रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र व समन्वय समितीच्या सभेचे कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्यात आली.

**A) गडचिरोली येथील औद्योगिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रातील वाटप झालेले प्लाट रद्द करणे :-**

गडचिरोली औद्योगिक क्षेत्रात एकूण 81.73 हेक्टर जागा असून त्यापैकी 36.84 हेक्टर जागा जागा विकसित करुन 125 प्लॉट व 5 शेड असे एकूण 130 प्लॉट आरेखीत करण्यात आले आहे. त्यापैकी 79 प्लॉट वाटप करण्यात आले आहेत व 4 शेड वाटप केलेले आहे त्यापैकी ज्यांनी सदरचे प्लॉट ताब्यात घेतले होते परंतू 5 वर्षापर्यंत त्यांनी उद्योग घटक सुरु करणे साठी काहीही कार्यवाही केली नसल्याने ते परत घेण्यात येऊन वाटपाची कार्यवाही केलेली आहे. तसेच आजमितीस 32 भूखंड वाटपासाठी शिल्लक **आहे असे श्री. शेळके म. औ. अधिकारी यांनी सांगीतले.**

**<u>B) गडचिरोली येथील औद्योगिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रातील बंद उद्योग घटकाबाबत :-</u>**

गडचिरोली औद्योगिक क्षेत्रातील बंद उद्योग घटक साप्रोया 1964 ते 1993 पर्यत एकूण 13 उद्योग घटक बंद असून त्याचेकडिल वसूली साठी राजस्व वसूलीचे प्रस्ताव तहसीलदार यांचेकडे पाठविण्यात आले असून वसूलीबाबत पाठपुरावा सुरु आहे.

**<u>C) गडचिरोली येथील औद्योगिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रातील सुरजागड लोह प्रकल्पाबाबत :-</u>**

सदरच्या उद्योग घटकास स्थायी मायनिंग लीजची परवानगी न मिळाल्याने उद्योग घटकासाठी कार्यपाही प्रलंबीत नाही.

**<u>D) गडचिरोली जिल्हयातील लोड शेडींग बाबत :-</u>**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपणी लिमीटेड चे अधिकारी सभेत गैरहजर असल्यामुळे कार्यवाही होऊ शकली नाही.

**E) गडचिरोली येथील औद्योगिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रातील बांधकाम पुर्ण झालेल्या नविन घटकांना विज पुरवठा करण्याबाबत :-**

गडचिरोली औद्योगिक क्षेत्रात ज्या भुखडावर नविन उद्योग घटकानी बाधकाम पूर्ण केले आहे अशा सर्व उद्योग घटकाना विद्युत जोडणी साठी मूख्यालयाचे पत्र क्र 22197 दि. 20.5.08 अन्वेय पाठविण्यात आले असून विद्युत पुरवठा महाराष्ट्र राज्य वि. कं लि यानीच करावयाचे आहे तसेच औद्योगीक क्षेत्रात मधील ॲप्रोच रोड ( संलग्न रस्ते) चे डांबरीकरण करण्यात येईल.असे श्री. कोमळकर, म.औ.वि.म. चद्रपूर यांनी सभेला सागीतले.

**<u>F) कुरखेडा येथील औद्योगिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रातील लेआउट मंजुरीबाबत :-</u>**

कु रखेडा तालुक्यातील मौजा नान्ही येथील 16.48 हेक्टर खाजगी जमीन संपादित करण्यात आली असून संपूर्ण जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या ताब्यात आहे. सदरच्या जमीनीचा

नकाशा आराखडा तयार केलेला असून त्यास अंतिम मंजुरी म.औ.वि.म.मुंबई मिळाली आहे. तसेच सदरच्या वसाहतीत पात्रता (FISIBLITY) साठी विभागीय अधिकारी मृ.औ.वि.म नागपूर यांचे कडे पाठविण्यात आले असे श्री.कोमळकर, यानी सागीतले

**G) <u>धानोरा लघु औद्योगिक क्षेत्र :-</u>**

धानोरा लघु औद्योगिक क्षेत्राकरीता मौजा लेखा या गावातील 11.80 हेक्टर खाजगी जमीन संपादित करण्यात आली असून संपूर्ण जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या ताब्यात आहे. पैकी 2.50 एकर जागेचे वाटप औद्योगिक प्रशिक्षण संस्था, धानोरा यांना केले असून बांधकाम सुरु आहे. त्यानंतर एकही मागणी अर्ज आलेला नाही.

**H) <u>अहेरी लघु औद्योगिक क्षेत्र :-</u>**

मौजा वांगेपल्ली येथे अहेरी लघु औद्योगिक क्षेत्राकरीता या गावातील 9.20 हेक्टर खाजगी जमीन संपादित केली आहे. मे. योगक्षेम इंडस्ट्रिज,यांनी जागेची मागणी केली होती परंतू त्यांनी त्यांचा उद्योग रद्द केल्याने निर्धारित भुखड परत घेण्यात आला आहे.

आष्टी ता़. चामोर्शी येथे 217.78 हेक्टर जमीन ताब्यात घेण्यासाठी म.औ.वि.म.मूबई यांचेकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.सदरच्या जगेची मागणी नाही व उद्योजकाचा अर्ज देखील नाही असे म.औ.वि.म. च्या अधिकाऱ्यांनी सांगीतले.

**I) <u>जिल्हा उद्योग केन्द्र, इमारत दुरुस्ती</u>**

उद्योग संचालनालय, मुंबई यांचे सुचनेनुसार जिल्हा उद्योग केंद्र इमारत दुरुस्तीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मंजूरी नंतर मुख्यालयास सादर केला जाईल.

**J) <u>सामुहीक प्रोत्साहन योजना - 2007</u>**

सामुहीक प्रोत्साहन योजना-2007 मध्ये या कार्यालयास दोन अर्ज प्राप्त झाले आहेत असे महाव्यवस्थापक जिउके गडचिरोली यांनी सांगीतले

**K) <u>जिल्हा सल्लागार समिती शी संबंधित मद्दे :-</u>**

**<u>जिल्हा उद्योग केन्द्र, गडचिरोली व्दारा राबविण्यात येणा-या विविध योजना :-</u>**

**A) <u>पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम :-</u>**

प.रो.नि.कार्यक्रमाअंतर्गत 30 युवकांचे स्वयंरोजगारासाठी कर्ज प्रकरणे बँकेत शिफारस करणे साठी मा. जिल्हाधिकारी साहेब यांच्या अध्यक्षतेखाली दि.17/07/09 ला कार्यपथक समितीची सभा होऊन मंजूर कर्जप्रकरणे प्रस्ताव मंजूरीसाठी संबंधीत बँक शाखेकडे पाठविण्यात येत आहे.

B) <u>सुधारीत बिज भांडवल योजना :-</u>

सदरहू योजनाअंतर्गत सन २००९-१० मध्ये सर्वसाधारण प्रवर्ग रु.४.५० लाख, विघयो रु. १.०० लाख व टिएसपी रु. 0.80 लाख तरतुद प्राप्त झाली आहे. रु. 1.40 लाख सर्वसाधरण प्रवर्गात खर्च करण्यात आला आहे.

जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना :-

सदरहू योजनाअंतर्गत सन 2009-10 मध्ये सर्वसाधारण प्रवर्ग रु.1.50 लाख, विघयो रु. 1.00 लाख व टिएसपी रु. 0.40 लाख तरतुद प्राप्त झाली आहे.

ग्रामीण भागातील उद्योजकाचे अर्ज गोळा करुन बँकेला पाठवण्याचे कार्य सुरु आहे. असे महाव्यवस्थापकांनी सांगीतले.

**D) उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम :-**

सदरहू योजनातंर्गत सन 09-10 मध्ये सर्वसाधारण प्रवर्ग रु.1.65 लाख, विघयो रु.05.00 लाख असे एकूण रु. 06.65 लाखाची तरतूद प्राप्त होवून त्याचे समप्रमाणात एमसीईडी व मिटकॉन यांना तांत्रिक व्यवसायाचे प्रशिक्षणासाठी वाटप करुन देण्यात आले

वरील योजनेत सन 08-09 वर्षात 100 % खर्च प्रशिक्षणावर करण्यात आला असे महाव्यवस्थापक, जि.उ.के. यांनी सांगीतले.

**E) जिल्हा पुरस्कार योजना :-**

जिल्हा पुरस्कार योजनातंर्गत सन 2008-09 वर्षातील जिल्हा पुरस्काराचे वाटप करण्यात आले. असून सन 2009-10 साठीचे प्रस्ताव तयार करणेचे काम सुरु आहे.

**F) कर्ज वसुली :-**

सन 2009-10 या वर्षात सर्व सुधारीत बिज भांडवल कर्ज योजना व जिल्हा उद्योग कर्ज याजना यामध्ये कर्जदारास त्यांचेकडून येणे असलेल्या थकीत रकमेबाबत मागणी नोटीस पाठविण्यात आले आहे` वसूलीची कार्यवाही सूरु आहे.

**G) सामुहीक प्रोत्साहन योजना :-**

सामुहीक प्रोत्साहन योजना 2001 अंतर्गत 136 अर्ज प्राप्त झाले असून, 113 प्रकरणात इरादापत्र दिलेत, पैकी 99 प्रकरणात पात्रता प्रमाणपत्र देण्यात आले असून विशेष भांडवली अनुदान मार्च 09 अखेर पर्यत जिल्हात विशेष भांडवली अनुदानाचा अनूशेष पूर्ण झालेला आहे.

**J) मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने वेळेवरील विषय :-**

1) महाराष्ट्र लघु औद्योगीक महामंडळाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा असे श्री. सोपान अग्रवाल सचिव जिल्हा लघु उद्योग संघटना वडसा यांनी सांगीतले. मा. अध्यक्षांनी त्याबाबत वरीष्ठ कार्यालयास कळवावे असे निर्देश दिले.

2) मे. ए.ए. एनर्जी वडसा यांनी एमएसईडीसी कडे 50 Kw करीता विद्युत पुरवठा बाबत माहिती सादर केली आहे.त्यावर MSEDC नी त्वरीत निर्णय घेऊन कार्यवाही कररावी असे सुचना मा. अध्यक्षांनी दिल्या. त्यानंतर सर्व संमतीने सर्व उपस्थितांचे आभार माणून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

निवासी उपजिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष
जिल्हा उद्योग मित्र व सल्लागार समिती

सदस्य सचिव,
तथा महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केन्द्र, गडचिरोली